M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education, Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, वाशी नवी मुंबई - 400 703.

क्र.मु.वि.मं / माध्य.परीक्षा/ 1567
वाशी, नवी मुंबई - 400 703
दिनांक - 26/03/2026

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य
सर्व मंडळ मान्यताप्राप्त
माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये
मुंबई दक्षिण, उत्तर, पश्चिम,
ठाणे, पालघर, रायगड

विषय :– माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा इ. १० वी व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा इ.१२ वी गुणपत्रक व प्रमाणपत्राबाबत

संदर्भ :- १. क्र.रा.म/परीक्षा–७/१३३७ पुणे ४११००४ दिनांक २५/०३/२०२६ रोजीचे पत्र
२. दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ चा कार्यकारी परिषद ठराव क्रं.११४

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भिय ठरावानुसार फेब्रुवारी–मार्च २०२६ परीक्षेपासून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र इ.१०वी व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इ१२ वी परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थ्यांना गुणपत्रक व प्रमाणपत्र स्वतंत्र न देता ती एकत्रित देण्यात येणार आहेत तसेच एकत्रित गुणपत्रक व प्रमाणपत्रावर विद्यार्थ्याचे नाव FIRST NAME, FATHER NAME, SURNAME या क्रमाने छपाई करण्यात येणार आहे. सदर क्रमाच्या अनुषंगाने कोणत्याही नावात त्रुटी उद्भवणार असल्यास त्याबाबतची दुरुस्ती मंडळाकडून तातडीने करून घेण्यात यावी.

फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या प्रवेशपत्रांवरील छायाचित्र अस्पष्ट असल्यास, त्यावर योग्य फोटो चिकटवून संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांना स्वाक्षरी करण्याचे निर्देश यापूर्वी दिलेले आहेतच त्यानुसार जर विद्यार्थाचे फोटो अस्पष्ट अथवा दुरुस्त केले आहेत त्यांची माहिती एकत्रित गुणपत्रक व प्रमाणपत्रावर अचूक छापण्यासाठी पुन्हा अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच, विद्यार्थ्याचे नाव दुरुस्ती संदर्भात मुख्याध्यापक/प्राचार्य स्तरावर शहानिशा/खात्री करण्यात यावी त्याकरिता मंडळाच्या संकेत स्थळावर PHOTO CORRECTION लिंक कार्यान्वित करण्यात आली आहे. त्याद्वारे आवश्यक दुरुस्ती करण्यात यावी व सदर दुरुस्त्या करावयाच्या राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

(ज्योत्स्ना शिंदे पवार)
विभागीय सचिव, (प्र)
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई ४००७०३

प्रत:- माहितीस्तव ,
राज्य मंडळ पुणे

Telephone : 27652445, 27662504, 27881077, 27881075, 27899987 *Fax : 27659494/27881349
Email : sschsc.mumbaiboard@gmail.com

Scanned with OKEN Scanner